# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५३९**

**अपिलार्थी श्री. राकेश बगोरिया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक**
नगर भूमापन अधिकारी, वांद्रे यांचे कार्यालय, महसूल भवन, ४ था व ५वा मजला,
वांद्रे स्टेशनच्या बाजूला, बस डेपो समोर, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०० ०५०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी**
नगर भूमापन अधिकारी, वांद्रे यांचे कार्यालय, महसूल भवन, ४ था व ५वा मजला,
वांद्रे स्टेशनच्या बाजूला, बस डेपो समोर, वांद्रे (पश्चिम),
मुंबई-४०० ०५०

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०८.२०२४ | १०.०९.२०२४ | २१.१०.२०२४ | २८.११.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १०.०९.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २८.११.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(1) Please provide me in writing alonwith copy of how many times your department is conducted survey on plot no 151 (city survey number 546) kherwadi bandra east mumbai 400051 during a period of 1960 to 2000.*

*(2) Please provide me copy of list of Tannary structure owner on plot no 151 (city survey number 546) kherwadi bandra east mumbai 400051 during a period of 1960 to 2000.*

*(3) Please provide me copy of site plane or map prepared by City Survey Officer for Tannary Structure on plot no 151 (city survey number 546) kherwadi bandra east mumbai 400051 during a period of 1960 to 2000.*

*(4) Please provide me file inspection (as per government of maharashtra circular 26/11/2018) regarding plot no 151 (city survey number 546) during a period of 1960 to 2000 and provide me documents that i want after file inspection.*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०९.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, नगर भूमापन वांद्रे पूर्व खेरवाडी ता.अंधेरी न.भू.क्र. ५४६ या मिळकतीचे सर्व्हे बाबतची माहिती / मोजणी बाबतची माहिती मोजणी रजिस्टर नंबर व दिनांक निहाय उपलब्ध असलेने, कृपया मो.र.नं. व मोजणी दिनांक पुरविल्यास सदर माहिती पुरविता येईल, याची कृपया नोंद घ्यावी. नगर भूमापन वांद्रे पूर्व खेरवाडी ता.अंधेरी न.भू.क्र. ५४६ या मिळकतीचे धारकाची माहितीसाठी https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/DSLR या संकेतस्थळावरील, ऑनलाईन मिळकत पत्रिकेवरुन धारकाची माहिती प्राप्त करुन घेणेस विनंती आहे. नगर भूमापन मिळकतीचे नकाशे जनतेसाठी नक्कला स्वरुपात पुरविणेसाठी उपलब्ध आहेत. सबब आपण इकडील कार्यालयाशी संपर्क साधून रितसर नक्कल अर्ज सादर करून, नक्कल फी (रु. ५५/- प्रति नकाशा) चलनाने भरणा करून, नकाशा नक्कल प्राप्त करणेस विनंती आहे. आपले माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने आपणास कळविणेत येते की, नगर भूमापन वांद्रे पूर्व खेरवाडी ता.अंधेरी न.भू.क्र. ५४६ या मिळकतीची स्वयंसुची धारीका अभिलेखात उपलब्ध असलेबाबत अभिप्राय संबंधित सजाचे परिरक्षण भूमापक यांनी नोंदविला आहे. सबब आपण इकडील कार्यालयात संपर्क साधून धारिकेचे निरीक्षण करून आपणास आवश्यक माहिती शासकिय शुक्ल (रु. २/- प्रति पान याप्रमाणे) भरणा करुन माहिती प्राप्त करून घेणेस विनंती आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २१.१०.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.११.२०२४ रोजी अपिलदार श्री. राकेश प्रेमचंद बगोरिया यांना नगर भूमापन बांद्रा पूर्व ता. अंधेरी न.भू.क्र. ५४६ या मिळकतीची स्वयंसूची धारीका दि. ०३.१०.२०२४ रोजी पुरविण्यात आलेली आहे. तसेच प्रश्नार्थक व माहिती संकलन करुन पुरविणेची माहिती देणेची तरतूद नसलेबाबत समजावून सांगितले व त्यास अपिलदार यांनी सहमती दर्शविली आहे असे नमुद करुन अपील अमान्य करुन निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे अधिवक्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०३.२०२६ आयोगासमोर सादर करुन विनंती केली की, ॲडशिनल कलेक्टर, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दि. १८.१०.१९७८ रोजी सचिव, महसून व वन विभाग यांना नगर भूमापन यांच्या पत्राचा संदर्भ देऊन कळविले होते. त्याअनुषंगाने सन- १९६० पासूनची माहिती त्यांना अपेक्षित आहेत. जेव्हा जन माहिती अधिकारी यांनी सन- १९९४ पासूनची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी अपिलार्थींना मुद्दा क्र. ४ च्या अनुषंगाने संबंधीत नस्तीची छायांकित प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थी यांनी मान्य केले की, नस्ती प्राप्त आहे. अपिलार्थींनी सन- १९९४ पुर्वीचे काही अभिलेख उपलब्ध असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे की, कार्यालयाशी संपर्क साधून रितसर नक्कल अर्ज सादर करुन नकाशा नक्कल प्राप्त करु शकता. अपिलार्थींनी मोजणी दिनांक नमुद करुन पुरविल्यास माहितीचा शोध घेऊन मोजणी नकाशाची प्रत पुरविणे शक्य आहे. त्याप्रमाणे उपलब्ध नकाशाची प्रत

..३/-

उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सादर केले की, मुद्दा क्र. १ संबंधी प्रश्नार्थक स्वरुपाची माहितीची मागणी केलेली आहे. जे की, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत पुरविणे अपेक्षित नाही.

७. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी कळविल्याप्रमाणे त्यांच्या अभिलेखावर उपलब्ध नकाशाची प्रत नक्कल फी भरुन प्राप्त करावी.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

5-3-2026

**मुंबई**
**दिनांक : ०५.०३.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**